पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०२/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
६. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
७. मा.कुटे चारुशीला प्रभाकर

या शिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.कांबळे - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामाकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.**

विषय क्र.१) प्रभाग क्र.६२ मध्ये मुख्यालय स्तरावर डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेबाबत (सन २०१४-१५) - मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) जलक्षेत्र क्र.बी/८ अंतर्गत निविदा क्र.७/११४-२०१३-१४ मधील काम वाल्हेकरवाडी येथे करणेबाबत - मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मनपाचे उद्यानाचे भुमीपुजन समारंभासाठी व इतर कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे - मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.४६ विजयनगर येथील ज्योतिबा उद्यानाशेजारी पार्किंग विकसित करणेबाबत - मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मा.महानगरपालिका सभेस अनुपस्थित राहणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मा.महानगरपालिका सभेस अनुपस्थित राहणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मा.महानगरपालिका सभेस अनुपस्थित राहणेबाबत - मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) मा.विधी समिती पाक्षिक सभेबाबत - मा.निलेश पांढरकर, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १५/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १० )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ४१ विषय क्रमांक : १

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील निविदा क्र.१९/३२-१५/१६ अन्वये प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मध्ये मुख्यालय स्तरावर डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.१७,२५,०००/- अक्षरी र.रु.सतरा लाख पंचवीस हजार फक्त) पेक्षा ३०.९०% कमी या ठेकेदाराकडून करारनामा करुन घेऊन ठराव क्र.१३४७२ दि.१०/११/२०१५ अन्वये यापूर्वी स्थायी समिती मार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.२३,००,०००/- प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. उर्वरित डांबरी रस्ते दहा वर्षापुर्वी केलेले असल्याने रस्त्यांचे डांबरीकरण करणे गरजेचे आहे. सदरची कामे रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदरचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. त्याची सुधारित अंदाजपत्रक र.रु.४९,९०,०००/- इतकी येत आहे व वाढीव र.रु.३२,६५,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडून मंजूर दराने सुधारित काम करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४२ विषय क्रमांक : २

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव -

जलक्षेत्र क्र.बी/८ अंतर्गत निविदा क्र.७/११४-२०१३-१४ मधुन विविध ठिकाणी पिंपरी येथे काम केलेले आहे. विषयांकित ठिकाणी आता सद्यस्थितीत काम करणेस जागा नसलेमुळे उर्वरित अंदाजित र.रु.५,००,०००/- एवढया पाईपच्या रकमेचे काम वरील निविदेमधून वाल्हेकरवाडी येथे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४३ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

मनपाचे उद्यानाचे भुमिपुजन समारंभासाठी व इतर कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे (विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे) निविदा क्र.१६/१७-२०१५-१६ सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक पान क्र.३१६ अ.क्र.२ कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचे मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.९,५७,०००/- कामामध्ये २३ वे फुले, फळे, भाज्या, बाग, वृक्षारोपन स्पर्धा व प्रदर्शन यासाठी लागणारी मंडप व स्टेज व्यवस्था तसेच मनपा मार्फत आयोजित केल्या जाणा-या स्वरसागर या कार्यक्रमासाठी लागणारी मंडप व्यवस्था व वाढीव कामे करणेत येणार आहेत. त्यामुळे कामाच्या खर्चात वाढ अपेक्षित आहे. सुधारित अपेक्षित खर्च र.रु.३५,००,०००/- इतका येत आहे. सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४४ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४६ विजयनगर येथील ज्योतिबा उद्यान शेजारी पार्कींग विकसित करणे निविदा नोटीस क्र.१६/०९/२०१५-१६ ठेकेदार मे.हर्ष एंटरप्राईजेस निविदा र.रु.२१,००,८४०/- या चालू कामास र.रु.४९,५०,०००/- इतक्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४५ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

मा.कैलास महादेव कदम यांची जानेवारी २०१६ च्या दि.२०/०१/२०१६ रोजी होणा-या मा.महापालिका सभेस त्याच प्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ चे नियोजित मा.महापालिका सभेची अनुपस्थिती न्यायालयीन कारणास्तव मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४६ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

मा.सदगुरु महादेव कदम यांची जानेवारी २०१६ च्या दि.२०/०१/२०१६ रोजी होणा-या मा.महापालिका सभेस त्याच प्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ चे नियोजित मा.महापालिका सभेची अनुपस्थिती न्यायालयीन कारणास्तव मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४७ विषय क्रमांक : ७

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

मा.सदगुरु महादेव कदम यांची जानेवारी २०१६ च्या दि.२५/०१/२०१६ रोजी होणा-या मा.महापालिका सभेची अनुपस्थिती वैद्यकीय कारणास्तव मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४८ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.गोरक्ष लोखंडे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समितीची दिनांक २०/०२/२०१६ ची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २५/०२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( नंदा विकास ताकवणे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७४/२०१६
दिनांक : ०६/०२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.